**प्रेसनोट** दि. 07/11/2025

**अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणेकडून दौंड नगरपरिषदेतील लेखाधिकारी व क्लर्क यांचेविरोधात लाचमागणी प्रकरणी गुन्हा दाखल**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे घटक** |
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण, गु.रजि.नं. 692/2025 |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7, 7 अ अन्वये. |
| **तक्रारदार** | पुरुष, वय 54 वर्षे |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | 1) श्रीमती भाग्यश्री भालचंद्र येळवे, वय 29 वर्षे, पद- लेखाधिकारी, दौंड नगरपरिषद, रा.ठि. रामदरा, लोणीकाळभोर,ता.हवेली,जि.पुणे,मुळगाव नाझरी, ता.जि.बिड, (वर्ग-3), 2) ओंकार संजय मेणसे, वय 37 वर्षे, पद- क्लार्क, दौंड नगरपरिषद, रा.ठि. हुडको कॉलनी, शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे, (वर्ग-3) |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | (1) अ.नं. 1 यांनी स्वतःकरीता प्रतिमहिना रू. 10,000/- (2) अ.नं. 2 यांनी स्वतःकरीता प्रतिमहिना रू. 5,000/-, (3) मुख्याधिकारी श्री. विजय कावळे हे तक्रारदार यांच्या एका एजन्सीकरीता रू. 25,000/- व दुसऱ्या एजन्सीकरीता रू. 20,000/-, पूरक आदेश काढण्याकरीता रू. 10,000/- |
| **पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम** | (1) अ.नं. 1 यांनी स्वतःकरीता रू. 14,000/- किंवा 15,000/-, मुख्याधिकारी यांचेकरीता 45,000/-, (2) अ.नं. 2 यांनी स्वतःकरीता रू. 5,000/- व अ.नं. 1 यांचेकरीता 10,500/- |
| **पडताळणी दिनांक** | दि. 07/03/2025, 10/03/2025 |
| **ठिकाण** | दौंड नगरपरिषद, दौंड येथे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती निता मिसाळ, सहा. पोलीस आयुक्त, लाप्रवि, पुणे (मो.क्र.9822214414) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती भारती मोरे, सहा. पोलीस आयुक्त, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9870156586) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार व त्यांची पत्नी यांच्या एजन्सी मार्फत दौंड नगरपरिषदेस सुरक्षा रक्षक तसेच कुशल अकुशल कामगार पुरविले जातात. सेवा पुरविल्यानंतर काढलेल्या देयकाचे बक्षीस म्हणून दौंड नगरपरिषद येथील लेखाधिकारी श्रीमती भाग्यश्री येळवे हे प्रति महिना 10,000/- रूपयांची व आलोसे क्र. 2 अकाउंट्स विभागातील लिपिक श्री ओंकार मेणसे हे प्रति महिना 5,000/- मागणी करत असल्याबाबत तसेच मुख्याधिकारी श्री विजय कावळे हे तक्रारदार यांच्याकडे त्यांचे एजन्सी ने पुरविलेल्या सेवेकरिता काढलेल्या देयकासाठी एका एजन्सी करिता रूपये 25,000/- व दुसऱ्या एजन्सी करता रूपये 20,000/-रकमेची बक्षिस म्हणून मागणी करत असल्याची तसेच त्यांनी पूरक आदेश काढण्याकरिता 10,000/-रूपयांची मागणी केले बाबतची तक्रार तक्रारदार यांनी दि.6/3/2025 रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे, येथे दिली होती.

तक्रारदार यांनी दिले तक्रारीच्या अनुषंगाने लाच मागणीबाबत दि. 7/3/2025 रोजी व दिनांक 10/3/2025 रोजी पडताळणी केली असता आलोसे क्र.1 श्रीमती येळवे यांनी पंचांसमक्ष तक्रारदार यांच्याकडे स्वतःकरिता 14,000/- किंवा 15,000 /- व मुख्याधिकारी यांच्याकरिता 45,000/- रूपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे तसेच आलोसे क्र.2 ओंकार मेणसे यांनी तक्रारदाराच्या काढलेल्या मागील दोन महिन्याच्या देयकाचे बक्षीस म्हणून स्वतः करिता 5,000/- व आरोपी क्र.1 येळवे यांचे करिता पंचासमक्ष 10,500/- रूपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याबाबत दौंड पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं. 692/2025, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7, 7 अ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक** - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट** - www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन अ‍ॅप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

7/11/25

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.
(मोबाईल क्रमांक- 9423884745)

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक
सत्यमेव जयते
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो

Scanned with CamScanner